O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.माअधि/अपिल/01 /2022-23
प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र.मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-401101, दुरध्वनी क्र : 28192828
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
जा.क्र.मनपा/मुलेप/ 38 /2022-23
दि.29/04/2022

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

निलेश संपत फापाळे
स्वप्न घर, घोडबंडर गाव,
पोस्ट मिरा, जि.ठाणे
......अपिलार्थी

विरुध्द

जनमाहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग
......प्रतिवादी

-: विवेचन :-

अपिलार्थी श्री. निलेश संपत फापाळे स्वप्न घर, घोडबंडर गाव, पोस्ट मिरा, जि.ठाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार लेखा परीक्षण कार्यालयाचे “आस्थापना विभागाचे केलेले लेखापरीक्षण आक्षेप” मिळणेबाबत माहिती अधिकार अपिल अर्ज दि. 04/02/2022 रोजी आस्थापना विभागामध्ये केला होता. सदर अर्ज आस्थापना विभागाने दि.23/03/2022 ईमेलद्वारे लेखापरीक्षण विभागास वर्ग केला. त्याअनुषंगाने सदर अपिलाची सुनावणी दि.28/04/2022 रोजी दुपारी 12.30 वाजता प्र.मुख्य लेखापरीक्षक यांच्या कार्यालयात ठेवण्यात आली होती. जा.क्र.मनपा/मुलेप/मा.अ./35/ 2022-23, दि. 22/04/2022 अन्वये श्री. निलेश संपत फापाळे अपीलार्थी यांना कळविले आहे.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल :-**

महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे लेखापरीक्षण विभागाने काढलेल्या परीच्छेदांची माहिती मिळणेबाबत

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

माहिती अधिकारात मागितलेली माहिती न दिल्याने अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी, आस्थापना विभाग तसेच जनमाहिती अधिकारी लेखापरीक्षण विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.27/04/2022 रोजी दुपारी 12.30 वाजता मुख्य लेखापरीक्षण यांच्या कार्यालयात जा.क्र.मनपा/मुलेप/मा.अ/35/2022-23 दि.22/04/2022 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस खालीलप्रमाणे अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. निलेश संपत फापाळे (अपिलार्थी)

२) सहा. आयुक्त तथा जनमाहिती अधिकारी, आस्थापना विभाग (सुनिल यादव)

३) लेखापरीक्षा अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी, लेखापरीक्षण विभाग (चारुशिला खरपडे)

**जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

**1) सहा. आयुक्त तथा जनमाहिती अधिकारी, आस्थापना विभाग (सुनिल यादव)**

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती आस्थापना विभागाच्या अभिलेख्यात उपलब्ध नाही. तरी ती माहिती लेखापरीक्षण कार्यालयाकडुन उपलब्ध करुन घेण्यात यावी.

**2) लेखापरीक्षा अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी, लेखापरीक्षण विभाग (चारुशिला खरपडे)**

लेखा परीक्षण कार्यालयाने सन 2002-03 ते 2015-16 पर्यंतचे लेखा परीक्षण अहवाल महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले आहे. त्यामुळे अपेक्षित असलेली माहिती आपण संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावी.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान आपल्या युक्तीवादामध्ये सदर माहिती मला आस्थापना विभागाकडुन 30 दिवसाचा कालावधी संपुनही उपलब्ध करुन दिलेला नाही. त्यामुळे सदर माहिती आस्थापना विभागाने तात्काळ उपलब्ध करुन द्यावी तसेच आक्षेपाची अनुपालने देखील उपलब्ध करुन द्यावी.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

अपिलार्थी यांनी प्रथम अपिलात आस्थापना विभागाचे लेखापरीक्षण आक्षेप मिळणेबाबतची माहिती अपेक्षीलेली आहे.

सबब जन माहिती अधिकारी लेखापरीक्षण विभाग यांनी अपिलार्थी यांना आस्थापना विभागाचे लेखापरीक्षण आक्षेपाची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर आक्षेपाचे अनुपालने मा. स्थायी समितीच्या मंजुरीने प्राप्त झालेनंतर आपणास उपलब्ध करुन देणेची कार्यवाही करता येईल. सद्यस्थितीत सदरची कार्यवाही प्रस्तावित असल्याने उपलब्ध करुन देता येत नाही.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सदर अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सदर आदेशाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई -400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांच्या आत अपिल दाखल करता येईल.

**(मंजिरी डिमेलो)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप-मुख्यलेखापरीक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत-**

1) **श्री. निलेश फापाळे, अपिलार्थी.**
2) **माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (आस्थापना विभाग)**
3) **माहिती अधिकारी तथा लेखापरीक्षा अधिकारी (लेखापरीक्षण विभाग)**

फापाळे

श्री. निलेश फापाळे यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आली एकुण पृष्ठ क्र. १ ते ४६.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय**

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/मु.ले.प./मा.अ./ 35 /2022-23** **दि.22/04/2022**

**प्रति,**
**निलेश संपत फापाळे**
**स्वप्न घर, घोडबंडर गाव,**
**पोस्ट मिरा, जि.ठाणे.**
**पिन:- 401107**

**विषय:- माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत**
**लेखापरीक्षण विभागाने आपल्या विभागाचे काढून दिलेल्या परिच्छेदाबाबत तपशीलवार माहिती मिळणेबाबत**

**संदर्भ:- श्री. निलेश संपत फापाळे यांचा दि.04/02/2022 रोजीचा माहिती अधिकार अंतर्गत अर्ज.**

उपरोक्त संदर्भिय माहितीच्या अधिकारा अंतर्गत केलेल्या अपिलांच्या अनुषंगाने दि.27/04/2022 रोजी दुपारी 12.30 वाजता सुनावणी करण्यात आली आहे.

तरी सदर सुनावणीस लेखापरीक्षण विभाग, 4 था मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर (प) येथे आपण उपस्थित रहावे.

फापाळे न

**(मंजिरी डिमेलो)**
**अपिलीय अधिकारी तथा**
**प्र. मुख्य लेखापरीक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत
श्री. सुनिल यादव (सहा. आयुक्त)
जनमाहिती अधिकारी
आस्थापना विभाग.

24.4.2022

E:\audit dep 2020-21\माहिती अधिकार\म अ NEW.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./ 39 /2021-22 दि.08/ 02/2022

प्रति,
मा. जनमाहिती अधिकारी तथा मुख्यलेखापरिक्षक,
लेखापरिक्षण विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखा परिक्षण विभाग
84
8/2/22

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत....
लेखापरिक्षण विभागाने आपल्या विभागाचे काढून दिलेल्या परिच्छेदाबाबत तपशीलवार माहिती मिळणेबाबत

संदर्भ :- श्री. निलेश संपत फापाळे यांचा दि.04/02/2022 रोजीचा माहिती अधिकार अंतर्गत अर्ज.

महोदय,

विषयांकीत प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रातील विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये संदर्भिय पत्र पुढील कार्यवाहीसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे. तरी संबंधितांस परस्पर माहिती देण्यात यावी व त्याची एक प्रत आस्थापना विभागात देण्यात यावी.

सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.

(सुनिल यादव)
जनमाहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
श्री. निलेश संपत फापाळे,
स्वप्न घर, घोडबंदर गांव,
पोस्ट मिरा, जि. ठाणे.
पिन-401107.

Z:\आस्थापना विभाग\आर.टी.आय\लेटर - 2022.doc

जोड पत्र - "ब" (नियम ५ (१))

# केंद्र शासनाचा माहिती मिळवण्याचा अधिकार २००५

कलम १९ (१) अन्वये अपिल

[stamp] ३४ ०५/०३/२२




प्रेषक
श्री निलेश संपत पापाळे
पत्ता ,स्वप्न घर ,घोडबंदर
गांव ,पो.मिरा त.जि ,ठाणे
पिन ४०११०७
मो.९१७२६५८८२३

प्रति,
मा. प्रथम अपिलीय अधिकारी
उप आयुक्त - आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका ता जि ठाणे

[stamp] मिरा भाईंदर महानगरपालिका ... ४८८८ ... ०७/०३/२०२२

आयुक्त
मि.भा.म न पा

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- श्री निलेश संपत पापाळे

२) अर्जदाराचे संपूर्ण पत्ता :- पत्ता ,स्वप्न घर ,घोडबंदर गांव,पो.मिरा .ता, जि. ठाणे ४०११०७ , मो. ९१७२६५८८२३

३) माहिती अधिकाऱ्याचा तपशिल :- जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग , मिरा भाईंदर महानगरपालिका.ता.जि.ठाणे.

४) ज्या आदेशा विरुध्द अपिल केले असेल तो आदेश प्राप्त झाल्याची तारीख :- निरंक

५) अपिल दाखल करण्याची शेवटची तारीख:- कळविलेली नाही.

६) अपिलाची कारणे :- दिनांक ०२/०२/२०२२ रोजी मी दिलेल्या माहिती अधिकाराचा अर्जामधील माहिती न दिल्यामुळे प्रथम अपिल.

७) माहितीचा तपशिल :

(एक) लेखा परीक्षण विभागाने काढलेल्या परिच्छेद बाबत माहिती मिळावी.

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित आहे त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे नाव : जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका,ता जि ठाणे .

८) ठिकाण :- भाईंदर

९ ) दिनांक :- ७ / ३ / २०२२

अपिलकाराची स्वाक्षरी

हितीचा अधिकर अधिनियम 2005 कलम 19(1) अन्वये दाखल प्रथम अपिलाची सुनवाणी अपील (प्रथम) क्र. ............, दि. 27/ 04 /2022, वेळ - दुपारी 12.30 वाजता.

१) निलेश संपत फापाळे
स्वप्न घर, घोडबंडर गाव,
पोस्ट मिरा, जि.ठाणे. ..... अपिलार्थी

विरुध्द

२) जनमाहिती अधिकारी तथा
लेखापरीक्षा अधिकारी, लेखापरीक्षण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका ..... प्रतिवादी

सदर सुनावणीसाठी खालील अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थित नाव | सही |
|---|---|---|
| 1 | **श्रीमती. चारुशिला खरपडे**<br>जनमाहिती अधिकारी (लेखापरीक्षण विभाग) | |
| 2 | **श्री. सुनिल यादव**<br>जनमाहीती अधिकारी (आस्थापना विभाग) | |
| 3 | **श्री. निलेश संपत फापाळे**<br>अपिलार्थी | |